गुरुवार, दि. ७ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३६० वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282




## राज्यगीत 'गर्जा महाराष्ट्र माझा' सर्व शाळांमध्ये बंधनकारक

### शिक्षणमंत्री दादा भुसे यांचा निर्णय

**भंडारा -** राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये राष्ट्रगीतानंतर आता राज्यगीत 'गर्जा महाराष्ट्र माझा' गाणं बंधनकारक करण्यात आलं आहे. ही सूचना फक्त मराठी माध्यमापुरती मर्यादित न राहता, सर्व शाळांवर लागू असणार आहे. या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी न करणाऱ्या शाळांवर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिला.

**मानवंदनेने गीत गायनाची अट**

मराठी शाळांमध्ये राष्ट्रगीत आणि राज्यगीत मानवंदनेने गायले जावे, असा आदेशही देण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती आणि राज्यभक्तीचे संस्कार रुजवण्याचा उद्देश असल्याचे भुसे यांनी स्पष्ट केलं.

**शिष्यवृत्ती परीक्षेचा विस्तार**

पूर्वी केवळ चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जात होती. मागील काळात ही पाचवी व आठवीसाठी सुरू करण्यात आली. आता चौथी, पाचवी, सातवी आणि आठवी - या चारही वर्गांतील **पान २ वर**

# मिरची वाहतूक ट्रकची अतिवेगाने धाव; अपघाताचा धोका वाढतोय!

### स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांची पोलिसांकडे वेग मर्यादा कमी करण्याची मागणी

**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** तालुक्यात सध्या मिरची मार्केट भरात असून, शेकडो गावांतून मोठ्या प्रमाणात मिरचीची आवक सुरू आहे. या भागातील मिरची थेट मुंबईजवळील वाशी मार्केट तसेच देशभरातील मोठ्या शहरांमध्ये पाठवली जाते. मिरची वेळेत पोहोचली तर जास्त भाव मिळतो, आणि त्यामुळे वाहनचालक मोठ्या वेगाने ट्रक चालवत असल्याचे चित्र दिसून येत आहे. वाहनचालक वेळ वाचवण्यासाठी आणि जास्त नफा मिळवण्यासाठी ट्रक अतिशय वेगाने चालवत आहेत. यामुळे सामान्य वाहनधारक आणि पादचाऱ्यांचे प्राण धोक्यात, रस्त्यालगतच्या व्यवसायिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी विशेषतः हॉर्न आणि स्पीडचा त्रास सहन कराव लागत आहे. सदोष ड्रायव्हिंगमुळे अपघात होण्याची शक्यता प्रचंड प्रमाणात वाढली आहे.

सध्या जाफ्राबादहून बाहेर जाणारे मिरची ट्रक अतिशय वेगाने जातात. पोलीस प्रशासनाने वेळीच लक्ष घालून कठोर उपाययोजना कराव्यात. नाहीतर मोठ्या प्रमाणात अपघात होऊ शकतात. अशी प्रतिक्रिया ॲड. किशोर गायकवाड यांनी युवा आदर्शच्या प्रतिनिधीशी बोलतांना दिली.

> जाफ्राबाद परिसरात शेतकऱ्यांच्या मिरचीच्या उत्पन्नाला योग्य बाजार मिळावा हे जितकं गरजेचं, तितकंच रस्त्यावरील नागरिकांचा जीव सुरक्षित राहणे आवश्यक आहे. त्यामुळे स्थानिक पोलीस व वाहतूक विभागाने तत्काळ लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

माझं गाडी सर्व्हिसिंगचं दुकान या मार्गावर आहे. संध्याकाळी ट्रक एकमेकांशी जणू स्पर्धाच करतात. हॉर्न वाजवत, प्रचंड वेगात धावत असल्यामुळे आमच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे व्यापारी लक्ष्मण शिंदे यांनी म्हटले आहे. परिसरातील व्यापारी व नागरिकांकडून स्पीड लिमिट लागू करावी, प्रत्येक ट्रकवर GPS किंवा स्पीड मॉनिटरिंग यंत्रणा बसवावी, पोलिसांनी नियमित नाकाबंदी आणि तपासणी मोहीम राबवावी, दंडात्मक कारवाई सुरू करावी अशा मागण्या केल्या आहेत.

ही समस्या सोडवण्यात उशीर झाल्यास, भविष्यातील अपघात होण्याची शक्यता आहे त्यामुळे याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे अत्यावश्यक आहे.




युवा आदर्श

### वावटळी ...

कपाळ मोक्ष समोरचा
डोके दगडा आफळी
संशयाच्या वावटळी
समाजा माते दुफळी
सापडे सावज सहज
असे रचली साफळी
विश्वास संशया ग्रस्त
उद्रेक जोरांत उफळी
आपले म्हणून मिरवा
गळ्यां बांधू साखळी
अपशब्द वाटे दुजास
गालावरी खुले खळी
शिलेदार बाजू वळवा
निर्माण करा पोकळी
दूर करा फुलां पासून
हळूचं एकेक पाकळी
व्यक्ती स्वातंत्र्य कुठे
ओरडे कानीक पाळी
आठवी कायदे कसे
आपलेवर येता पाळी
आवर घाला जिव्हेस
कधी बा संयम पाळी
तवा तुमचा तापवला
दुसरा भाजतो पोळी
शब्दांची आतषबाजी
सजे बुध्दीचीदिवाळी
लक्तरे मांडतो अब्रुची
चविष्ट खातो फराळी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## महसूल अभियान राबविल्यामुळे प्रशासन अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि लोकाभिमुख होत आहे - आमदार बबनराव लोणीकर

### महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान परतुर आणी मंठा येथे संपन्न

**परतूर । प्रतिनिधी -** महाराष्ट्राच्या प्रत्येक नागरिकाच्या जीवनाला सुलभ आणि समृद्ध करण्यासाठी राबवला जात असलेला हा उपक्रम म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान. या अभियानाचे नाव ऐकताच आपल्या मनात छत्रपती शिवाजी महाराजांच्या न्यायी, लोककल्याणकारी आणि गतिमान प्रशासनाची आठवण येते. त्यांच्या आदर्शांवर आधारित हा उपक्रम महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाल महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने सुरू केला आहे, ज्याचा उद्देश आहे सर्वसामान्य जनतेच्या, विशेषतः शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांच्या दैनंदिन समस्यांचे त्वरित निराकरण करणे असा आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री, परतूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष लोकप्रिय आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग मार्फत



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान परतुर तहसील कार्यालयाच्या वतीने आज परतूर शहरात वातानुकुलित असलेल्या माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी नाट्यग्रहात तर मंठा येथे तहसील कार्यालयात संपन्न झाला. या प्रसंगी उपस्थित हजारो नागरिकांना मार्गदर्शन करत असताना ते बोलत होते. पुढे बोलताना माजी मंत्री, आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की हे अभियान म्हणजे प्रशासन आणि जनता यांच्यातील दरी कमी करण्याचा एक पूल आहे. आपल्या सर्वांना माहिती आहे, की रहिवासी दाखले, उत्पन्न दाखले, जातीचे दाखले, सात-बारा नोंदी, फेरफार, रेशन कार्ड किंवा शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी अनेकदा सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. पण या अभियानामुळे ही प्रक्रिया आता तुमच्या दारापर्यंत येत आहे. गावागावांत, मंडळ स्तरावर आयोजित केल्या जाणाऱ्या या शिबिरांमुळे तुमच्या समस्या तात्काळ सोडवल्या जातील. यामुळे प्रशासन अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि लोकाभिमुख होत आहे.

या शिबिरांमध्ये रहिवासी दाखले, उत्पन्न दाखले, रेशन कार्ड वाटप, संजय गांधी निराधार योजना, पीएम किसान योजना यासारख्या योजनांचा लाभ थेट नागरिकांना दिला जातो. यामुळे ग्रामीण भागातील लोकांना शासकीय कार्यालयांपर्यंत जाण्याचा त्रास वाचतो आणि त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचतात असे आपल्या भाषणात जालना जिल्हाधिकारी अमिषा मित्तल यांनी सांगितले. जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी एम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना हा उपक्रम 'गतिमान प्रशासन आणि आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण' या जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत राबवला जात आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी २५ मार्च २०२५ रोजी याबाबत **पान २ वर**

## महात्मा फुले मार्केट आणि समृद्धी महामार्गासाठी आज मुंबईत निर्णायक बैठक

### शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांची माहिती

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील महात्मा फुले मार्केट उभारणी तसेच जालना-नांदेड समृद्धी महामार्ग संदर्भातील दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न सुटण्यासाठी उद्या, ७ ऑगस्ट रोजी मुंबईत महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडणार असून, आमदार अर्जुन खोतकर या बैठकीला उपस्थित राहणार आहेत.

या बैठकीत जालना शहरातील व्यापारी तसेच महामार्गावरील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. महात्मा फुले मार्केट ही व्यापाऱ्यांची दीर्घकालीन मागणी आहे. अनेक मोर्चे, धरणे, निवेदने देऊन त्यांनी शासनाचे लक्ष वेधले होते. सुसज्ज व आधुनिक बाजारपेठेअभावी व्यवसाय अडचणीत आल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. या मार्केटच्या उभारणीतूनः व्यापाऱ्यांना चांगल्या सुविधा, ग्राहकांना एकाच ठिकाणी भाजी, फळे, धान्याची उपलब्धता, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



गेल्या काही महिन्यांपासून जमीन संपादन, योग्य भरपाई आणि पुनर्वसनाच्या मागण्यांवरून शेतकऱ्यांनी आंदोलन सुरू ठेवलं आहे. त्यांचा विकासाला विरोध नाही, पण आमचे हक्क अबाधित राहावे, अशी त्यांची मागणी आहे. हा महामार्ग पूर्ण झाला तर शेतीमाल वाहतूक जलद व सुलभ, नांदेड, हिंगोली, जालना जिल्ह्यांतील औद्योगिक गुंतवणुकीला गती, स्थानिक विकासाला बळ मिळेल, अशी अपेक्षा आहे. व्यापारी आणि शेतकऱ्यांच्या मागण्यांवर राज्यस्तरीय चर्चेचा अंतिम टप्पा आहे. उद्याच्या बैठकीत सकारात्मक निर्णय होईल, अशी आम्हाला पूर्ण आशा आहे. जालनावासीयांचा सातत्यपूर्ण लढा आता फळाला येणार आहे.

जालनावासीय आणि व्यापारी वर्ग या बैठकीकडे आशेने पाहत असून, निर्णय सकारात्मक आल्यास शहराच्या विकासाचा नवा अध्याय सुरू होईल.

## 'विजय उत्सव' पुरस्कार मिळाल्याबद्दल गौरव करवा यांचा सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** येथील प्रतिष्ठित व्यापारी गौरव करवा यांना रोटरी क्लबच्या वतीने नुकताच बेस्ट डिस्टिक सेक्रेटरीचा 'विजय उत्सव' पुरस्कार देण्यात आला. याबद्दल गौरव करवा यांचा सुरेश साबू यांच्या हस्ते रोटरी क्लबच्यावतीने सत्कार करण्यात आला.

जालना शहरातील हर्षवर्धन लॉन येथे दोन दिवसांपूर्वी रोटरी क्लबचा पुरस्कार सोहळा पार पडला आहे, या पुरस्कार सोहळ्यामध्ये रोटेरियन गौरव करवा यांना रोटरी क्लबच्या वतीने बेस्ट डिस्टिक सेक्रेटरीचा आवर्ड देऊन गौरव करण्यात आला आहे, संपूर्ण जिल्ह्याभरात रोटरी क्लब चे १०० क्लब असून या १०० पैकी श्री करवा यांच्या क्लबची निवड करण्यात आली असून त्यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले असल्याची माहिती स्वतः श्री करवा यांनी दिली.

रोटरी क्लबचे जिल्ह्याचे प्रमुख डॉक्टर सुरेश साबू यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला असल्याची माहिती यावेळी **पान २ वर**

## संपादकीय पान

### दोन राष्ट्रगीतांचे जनक

भारत मातेचे महान सुपूत्र , चित्रकार, नाटककार, काद-बरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची पुण्यतिथी. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर - सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेत-ले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबद्दल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांज-लीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने सर ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्र-गीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकाराम ांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रे-रणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक म हान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# मोदीजींना विश्रांती द्या, नितीन गडकरींना पंतप्रधान करा

ऑपरेशन सिंदूर वरून लोकसभा आणि राज्यसभेत विरोधी पक्षांनी सरकारला धारेवर धरले.युद्ध का, कोणी आणि,कशासाठी थांबवले.आपली युद्धात सरशी झाली कि अपयश आले.आपले किती जवान शाहिद झाले,किती शस्त्र आयुधे निकामी झाली,किती लाख कोटींचे नुकसान झाले, ट्रम्प कोणत्या अधिकारात भारतावर शाब्दिक आक्रमण करीत श्रेय घेत आहेत,टॅरिफ चे आक्रमण करून भारताची आर्थिक स्तिथी दोलायमान करीत आहेत,देशात चीन ची चिंताजनक वाढती घुसखोरी, अमेरिकेचा गुन्हेगार असलेल्या गौतम अदानी हा नरेंद्र मोदींच्या आशीर्वादाने संपूर्ण देशात वर्चस्व गाजवत आपले साम्राज्य विस्तारात नेत आहे,राहुल गांधी यांनी भर लोकसभेत नरेंद्र म ोदींवर वीस हजार कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप केला ते सत्य काय आहे ह्याचा उलगडा अद्याप का झाला नाही.पंतप्रधान नरेंद्र मोदी जगभर प्रवास करत आहेत ते कशासाठी कोणासाठी ? स्वतःला विश्वगुरूचा खोटा दांभिक मुखवटा चढवून देशवासियांच्या भावनेशी खेळत आहेत.दांभिकपणे वागून परदेशात देशाची नाचक्की करत आहेत. देशातली जनता हि कमालीची मूर्ख समजून खोटं बोल पण रेटून बोल हा कित्ता अद्याप गिरवत आहेत, आणि मूर्ख भक्तगण अक्कल गुडघ्यात ठेवून त्यांची पाद्यपूजा करतात हे खरंच देशाला अधोगतीकडे नेणारे आहे. हा रसातळाला जाणारा देश फक्त दांभिक मोदींचा नसून तुमचा आम चा सर्वांचा आहे त्याचे रक्षण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे.



तेव्हा अंधभक्तानो जागे व्हा मोदीना नव्हे तर देशाला वाचवा. मोदीजीनी स्वतःच्या राहिलेल्या दबलेल्या इच्छा आकांक्षाची ऐय्याशी पूर्ण करण्यासाठी देशाचे लाखो कोटी रुपयांचा चुराडा केला त्याने देशाचा आर्थिक उत्कर्ष होण्याऐवजी देशावर लाखो कोटींचे कर्ज झाले. मोदींनी घेतलेले प्रत्येक निर्णय हे देशाला अधोगतीकडेच नेणारे सिद्ध झाले.मणिपूर उध्वस्त झालेच,देशात अनेक ठिकाणी आर्थिक आणि जीवहानी झाली,मोदीजी कुठेच गेले नाहीत,गेल्या अकरा वर्षात एकही पत्रकार परिषद घेतली नाही,मन कि बात सारखे टुकार कार्यक्रम करून स्वतःला फक्त चर्चेत ठेवण्याचे कसब मात्र सुरु ठेवले,गरज सरो वैद्य मरो ह्या उक्तीप्रमाणे अडवाणी,यशवंत सिन्हा,मुरली म.जोशी व वापरा आणि फेकून द्या ह्या प्रमाणे स्मृती इराणी,कंगना राणावत,प्रकाश जावडेकर अश्या अनेकांना मार्गातून दूर केले.ह्या सर्व घटनेवरून एकच सिद्ध होते की,मोदीजी हे देशाचा कार्यकर्त्यांचा विचार न करता फक्त स्वतःचाच विचार करणारे देशाला लाभलेले कृतघ्न नेते आहेत. उरी,पुलवामा मध्ये नाहक जवान मारले गेले,आणि आता पहलगाम घाटीत निष्पाप पर्यटक नागरिक दहशदवाद्यांनी ठार मारले.हे केंद्र सरकारचे अपयशच आहे.संपूर्ण जग हादरले पण त्याचा परिणाम पंतप्रधान पदाला काळिमा फासणाऱ्या नरेंद्र मोदींवर झाला नाही इतके आपले पंतप्रधान थंड रक्ताचे व निष्क्रिय डोळ्यांचे आहेत. संपूर्ण देश आर्थिक संकटात आहे,अधोगतीकडे वाटचाल करत आहे.देशाचा जिडीपी कमालीचा घसरला आहे,जगाच्या नकाशावर आपण कोणत्या क्रमांकावर आहोत ह्याची माहिती देशातील सर्व साम ान्य जनतेला सुद्धा माहित आहे. तरी मोदीं काळजी न करता आपला रक्तलांछित तोरा मिरवतात आणि भाजपचे नेते,कार्यकर्ते,मतदार देशाची उद्ध्वस्त धर्मशाळा उघड्या डोळ्यांनी निष्क्रियतेने पाहतात.म ोदी है तो मुमकिन है,हे मोदीजींनी देशाची चहुबाजूनी वाताहत करून दाखवली.मोदी भक्त हे मेलेल्या आईचे दूध पियुन जन्माला आले आहेत काय?बुद्धी भ्रष्ट झाली आहे काय? मनाला,विचाराना गंज लागला आहे काय ? कि, बहुतांश भाजप नेते,कार्यकर्ते,प्रवक्ते,भक्त हे भ्रष्टाचारी,खुनी,व्यभिचारी,असावेत. त्यांच्या काळ्या कर्तृत्वाची फाईल मोदींकडे असाव्यात.सर्व प्रशासकीय यंत्रणा आपल्यावर कोणतेही शासकीय संकट येऊ नये म्हणून अनिच्छेने मोदी ची तळी उचलून धरत आहेत काय ? मोदी सर्वांना ब्लॅकमेल करत असावेत म्हणून ते बेलगामपणे देशावर हुकूमशाह सारखे राज्य करत आहेत.प्रशासकीय अधिकाऱ्यानी सुद्धा मोदींच्या नादी लागून देशाचे आर्थिक लचके तोडत देशात विदेशात संपत्ती गोळा करत आपले सर्वतोपरी उखळ पांढरे केले असणार म्हणून डोळ्यावर कातडे ओढून देशाची होणारी अधोगती निष्क्रियतेने पाहत आहेत. ह्या सर्वांच्या नाड्या मोदीजींच्या हाती आहेत. मोदी हे खरोखरच देशाचे नागरिक आहेत काय ? कारण कोणताही देशभक्त आपल्या देशाची वाताहत करत नाही तर उत्कर्ष करतो. काळाची गरज आणि देशाची होत असलेली वाताहत थांबवण्याकरिता ज्यांचा आत्मा अजून जिवंत आहे अश्या सर्व भाजप वाल्यानी मेलेल्या आत्मवाल्यानासुद्धा देशहितासाठी प्रवाहात सामील करावे. सोबत विरोधी पक्ष व पिडलेली जनता आहेच.मोदींच्या विरोधात बोलून,बंड करून त्यांना सत्तेवरून खाली खेचले पाहिजे.आरएसएस व भाजप नेत्यांनी भावी पंतप्रधान म्हणून अजातशत्रू श्री.नितीन गडकरी याना संधी दिली पाहिजे. दिल्लीत सप्टेंबर मध्ये फार मोठे राजकीय अघटित घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**यशवंत चव्हाण**
**सीबीडी बेलापूर(नवी मुंबई)**
**दूरध्वनी क्र.९९२०७७६२७७**

## भोकरदन पोलीस ठाण्यात प्रतिक्षालय उपलब्ध करून द्या - पोलिस अधिक्षक



**भोकरदन । प्रतिनिधी-** भोकरदन पोलीस ठाण्यात एखादा व्यक्ती तक्रार देण्यासाठी गेल्यास त्यांना त्या ठिकाणी बसण्याची अथवा प्रतिक्षालय कक्ष नसल्याने नागरिकांची फजिता होते. त्यामुळे या पोलीस ठाण्याच्या आवारात प्रतिक्षालय उभारण्यात यावा, या मागणीसाठी आज शिवसेना उपतालुका प्रमुख अर्जुन ठोंबरे यांनी पोलीस अधिक्षक अजयकुमार बंन्सल यांची घेत समस्या मांडली.

नागरिकांची अति वर्दळ आणि प्रचंड लोकसंख्या असलेल्या भोकरदन या तालुक्यातील भोकरदन पोलीस ठाण्यामध्ये न्यायाच्या अपेक्षाने आपली तक्रार घेऊन येणाऱ्या खेड्या-पाड्यातील नागरिकांना बसण्यासाठी (प्रतिक्षालय सारख्या) नागरी सुविधाचा अभाव असल्याने त्यांचे अतोनात हाल होत आहे. पोलीस ठाण्यामध्ये येणारे सर्वसामान्य गोरगरीब नागरिक, कष्टकरी शेतकरी बांधवांसमोर अगोदरच असंख्य अडचणीचा डोंगर उभा असतो. त्या अडचणीच्या डोंगराम धून कसाबसा रस्ता काढून तो एखाद्या विषयासंदर्भात न्यायाच्या अपेक्षाने आपली तक्रार घेऊन पोलीस ठाण्यामध्ये आल्यानंतर संबंधित अधिकारी काही कारणास्तव उपलब्ध नसेल किंवा तक्रारीच्या निवारण हेतू वेळ लागत असल्यास त्यांना सुरक्षित आरामदायक सुखत क्षणांची जाणीव व्हावी. पण येथे ही त्याच्या नशिबी संघर्षच येथे आल्यानंतर वादळ, वारा, पाणी, पाऊस, ऊन यापासुन आपले संरक्षण करता यावे. म्हणून साधी बसण्यासाठी/प्रतिक्षालयाची सुध्दा नागरी सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांना खूप मोठ्या अडचणीचा सामना करावा लागतो. एखाद्या विषयासंदर्भात न्यायाच्या अपेक्षाने आपली तक्रार घेऊन येणाऱ्या नागरिकांना पोलीस ठाण्यामध्ये आल्यानंतर तरी बसण्यासाठी' रुफिंग शीट शेड' अर्थात एखादी लहान, साथी रचना किंवा पत्र्याची छत असलेल्या प्रतिक्षालयाची तरी सुविधा उपलब्ध करून देत त्यांचे अंतोनात होणारे हाल थांबवावे आणि नागरिकोना एक माणूस म्हणून जगण्याचा हक्क द्यावा, अशी मागणीही उपतालुकाप्रमुख अर्जुन ठोंबरे यांनी केली आहे.

## वाचकांचे मनोगत

### प्रशासनावर लक्ष ठेवणारे पहारेकरी कुठे गेले ?

वसई- विरार महानगरपालिकेचे माजी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्यावर १२ ठिकाणी सक्तवसुली संचालनालय विभागाने २९ जुलै २०२५ रोजी केलेल्या कारवाईत १ कोटी ३३ लाख रुपये व कागदपत्रे जप्त केली.त्यांच्या बदलीनंतर महापालिकेच्या फाईल्स त्यांच्या बंगल्यात स्वाक्षरी करिता जात.बांधकाम परवानगी त्यांच्या सहीचा दर ३५ रुपये प्रती चौरस फूट. प्रशासकीय कामकाजावर लक्ष ठेवणारे पहारेकर्याची भूमिका बजावणारे लोकप्रतिनिधी राजकारणात गुंतले असल्याने प्रशासनावर वचक राहीला नाही.काही महानगरपालिकांमध्ये प्रशासकीय राजवट सुरू आहे.आयुक्तांकडून सौदे होतात हे जेव्हा शिपायापासून वरच्या अधिकाऱ्यांपर्यंत समजते तेव्हा अशा कार्यालयात सामान्य जनतेची लयलूट होते. यालाच भ्रष्टाचार असे संबोधतात. मोदी सत्तेवर येण्या अगोदर प्रचार सभांमधून सांगत ' ना खाऊंगा ना खाने दुंगा ' पुढे नागरिकांची लूटमार वाढली.अनिलकुमार पवार सारखे महापराक्रमी अधिकारी सर्वच शासकीय/ निमशासकीय कार्यालयात अस्तित्वात आहेत. सक्तवसुली संचालनालय विभागाने थोडा वेळ राजकारणी नेत्यांना बाजूला ठेवून आपला मोर्चा यांच्या दिशेस वळवला तर महाराष्ट्रवरचे कर्ज बर्यापैकी फेडता येईल.ग्रामपंचायत पासून तालुका,जिल्हा ,राज्य पातळीवरील सर्व स्तरावर काही दिल्या शिवाय काही मिळत नाही हे सर्वश्रुत आहे.महाराष्ट्र पोलीसांच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाई होते ती कोणी तक्रार केली तर.महाराष्ट्र पोलीस विभागाचा दबदबा होता.मुंबई- महाराष्ट्रातील पोलिसांचे नावलौकिक आहे.असे असताना काही दुर्दैवी घटना घडल्यास पोलीस तपास यंत्रणांना डावलून सी बी आय, एस आय टी, ईडी यांच्याकडे चौकशीची मागणी केली जाते. यांच्यावर विश्वास ठेवून आपल्या पोलिसांना दुर्लक्षित केले जाते.सरकारकडून खरेच भ्रष्टाचाराविरुद्ध ठोस कारवाई होणार की नाही.अनिलकुमार पवारांचे धागेदोरे नासिक पर्यंत गेले आहेत. मोठे उच्च पदस्थ अधिकारीच लूटमार करणारे निघाले तर सामान्य नागरिकांनी न्याय कोणाकडे मागायचा असा प्रश्न निर्माण झाला आहे.गाडी ,बंगला,मौल्यवान जडजवाहीर, सोनेनाणे मुबलक मिळवण्यासाठी सरकारी पदाचा गैरवापर सर्रास होतो आहे.अनिलकुमार पवार हे एक उदाहरण आहे.चला ! भ्रष्टाचारी शोधुन या ! अशी घोषणा कोणी नेत्यांनी केली तर तो निवडणुकीत निवडून येईल एवढा पाठिंबा मिळेल यात शंकाच नाही.

**महादेव गोळवसकर**
**कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार स्वयम योजनेसाठी अर्ज करावेत

**जालना । प्रतिनिधी -** इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी व वसतिगृह प्रवेशापासून वंचित असलेल्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम योजनेसाठी अर्ज दि. १७ ऑगस्ट २०२५ रोजीपर्यंत मागविण्यात आले आहे. तरी या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर म ागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना सुरू करण्यात आली आहे. यावर्षीची दि. १ ऑगस्ट २०२५ पासून वसतीगृह प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत, असेही कळविले आहे.

पान १ व ४ वरुन

### राज्यगीत गर्जा ..

विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येणार आहे. यामुळे शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय वाढवण्याचा संकल्प शिक्षणमंत्र्यांनी व्यक्त केला.

**विद्यार्थ्यांसाठी हेल्थ कार्ड योजना**

उच्च दर्जाचं शिक्षण देताना विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडेही लक्ष देणे आवश्यक असल्याचे भुसे यांनी सांगितले. यापुढे विद्यार्थ्यांची तपासणी केवळ औपचारिकतेपुरती मर्यादित राहणार नाही.

आरोग्य पथक ही तपासणी पालकांच्या उपस्थितीत करणार असून, त्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला एक हेल्थ कार्ड दिले जाणार आहे. हे कार्ड त्यांच्या भविष्यातील अनेक गरजांमध्ये उपयुक्त ठरणार असल्याचे शिक्षणमंत्र्यांनी नमूद केले.

**शैक्षणिक गुणवत्ता आढावा बैठक**

या महत्त्वाच्या घोषणांची पार्श्वभूमी भंडारा येथे घेण्यात आलेल्या शैक्षणिक गुणवत्ता आढावा बैठकीत होती. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना दादा भुसे यांनी हे सर्व निर्णय जाहीर करत, कार्यान्वयनासंबंधी स्पष्ट सूचना दिल्या.

राज्यातील शिक्षण क्षेत्रात शिस्त, गुणवत्ता आणि व्यापकता वाढवण्याच्या दृष्टीने या निर्णयांकडे महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

### महसूल अभियान ...

शासन निर्णय जाहीर केला, ज्यामुळे या अभियानाला अधिक गती मिळाली. या शिबिरांमुळे प्रशासन आणि जनता यांच्यातील विश्वास वाढत आहे. प्रत्येक शिबिरात प्रशासकीय अधिकारी स्वतः उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारी ऐकतात आणि त्यांचे निराकरण करतात असे नमूद केले. परतुर विभागाचे उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांनी या अभियानामुळे ग्रामीण भागातील शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे. स्थानिक पातळीवर शिबिरांचे आयोजन केल्याने नागरिकांना दूरवर प्रवास करण्याची गरज नाही. शिवाय, छत्रपती शिवाजी म हाराज यांच्या नावाने हे अभियान राबवले जाणे, त्यांच्या लोककल्याणकारी शासनाच्या आदर्शांचा सन्मान करते आणि प्रशासनाला प्रेरणा देते असे म्हटले. परतुर भाजपा तालुका अध्यक्ष शत्रुघन कणसे, माजी जिल्हा परिषद सदस्य अशोकराव बरकुले, सुदामराव प्रधान, रमेशराव भापकर, गजानन लोणीकर, तुकाराम सोळंके, सावता काळे, बंडू मानवतकर, किरण अंभोरे, प्रवीण सातोंणकर, संदीप बाहेकर, प्रकाश चव्हाण कृष्णा आरगडे, बाबाराव थोरात. श्रीसर गांजाळे,संभाजी घनवट, पद्माकर कवडे, मिरज खतीब, छायाताई घोरबंड, बालाजी सांगुळे, संभाजी घनवट, सुरेश काळे, नरेश कांबळे, अर्जुन जगताप, वसंत भापकर. धोंडीराम नवल, केशव ढवळे या बरोबर जालना जिल्हाधिकारी श्रीमती असीमा मित्तल, जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी एम मित्रू, उपविभागीय अधिकारी डॉ. पद्माकर गायकवाड, परतूर तहसीलदार श्रीमती प्रतिभा गोरे, जालना तहसीलदार श्रीमती छाया पवार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नाना कापसे, उपविभागीय कृषी अधिकारी राम रोडगे, परतुर गट विकास अधिकारी राजेश तांगडे, जालना गटविकास अधिकारी संदीप पवार. तालुका कृषी अधिकारी विष्णू राठोड, प्रकल्प संचालक सुनील पठारे, गटशिक्षणाधिकारी अशोक सोळंके, मुख्याधिकारी न.प. परतूर, मंडळ अधिकारी परतूर/ नेर-सेवली, विस्तार अधिकारी परतूर/नेर-सेवली. ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) परतूर/ नेर-सेवली, ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) परतूर/ नेर-सेवली, परतूर तालुक्यातील आणी नेर सेवली सर्कल मधील सरपंच उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह हजारो लाभार्थी नागरिक यावेळी उपस्थित होते. तर मंठा येथे सतीशराव निर्वळ, संदीपभैय्या गोरे, पंजाबराव बोराडे, वैजनाथ बोराडे, नितीन राठोड, विठ्ठलमामा काळे, दिपक बोराडे, विलास घोडके, अमोल मोरे, शरद पाटील, दीपक दवणे, मनोज देशमुख, आबासाहेब सरकटे, प्रसाद गडदे, तानाजी शेंडगे या बरोबर उपविभागीय अधिकारी डॉक्टर पद्माकर गायकवाड, जालना जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बनसोडे, तहसीलदार मंठा गटविकास अधिकारी मंठा यांच्यासह मंठा तालुक्यातील मंडळ अधिकारी विस्तार अधिकारी तलाठी ग्रामसेवक कृषी सहाय्यक सरपंच उपसरपंच चेअरमन यांच्यासह हजारो लाभार्थी उपस्थित होते.

### विजय उत्सव ...

श्री करवा यांनी दिली आहे. रोटरी ही एक सामाजिक संस्था असून राज्यभरात व जिल्हाभरात विविध उपक्रमात या संस्थेचा सहभाग असतो व नागरिकांच्या हिताच्या उपाययोजना सुद्धा या संस्थेच्या माध्यमातून राबवल्या जातात ज्यामध्ये स्वच्छता वृक्ष लागवड नागरिकांचे आरोग्य जोपासणे यासारख्या विविध उपाय योजना या संस्थेच्या माध्यमातून कित्येक वर्षापासून केल्या जात आहे. यामध्ये गौरा यांचा जो क्लब आहे हा शहरातील व परिसरातील प्लास्टिक संकलनावर काम करत आहे. यावेळी रोटरियन करवा यांनी शहरात केलेल्या विविध कामासंदर्भात सुद्धा त्यांनी माहिती दिली आहे ,यामध्ये जिल्हा रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांना बसण्यासाठी करण्यात आल्या शेडचा त्यांनी उल्लेख करत जिल्हे भरात व शहरात विविध योजना आम्ही रोटरी क्लब च्या वतीने राबवत आहोत त्यामुळे नागरिकांनी सुद्धा समाजसेवा करावी असे आवाहन यावेळी त्यांनी केले आहे. अनुप जिंदल, अनुप जाजु, योगेश पाटणी, अभिजीत गोधा, अविनाश सचदेव, निलेश राठी, नितीन अग्रवाल, जितेंद्र मुंदडा ,मुकेश श्रोत्रीय, मुकुंद करवा, सुमित अग्रवाल, आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

महसूल सप्ताहनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज; महाराजस्व अभियान कार्यक्रम उत्साहात संपन्न

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी घेतला परतूर शहरातील विविध विभागांचा आढावा





जालना/जिल्ह्यात १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. महसूल सप्ताहाच्या अनुषंगाने स्व. पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी नाट्यगृह परतूर येथे परतूर तहसील कार्यालयाच्यावतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी उपस्थित राहून महसूल विभागातील उत्कृष्ट कार्य करणारे महसूल अधिकारी व कर्मचारी यांचा गौरव केला.

तसेच शासनाच्या विविध विभागाच्या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना मंजुरीपत्राचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास उदघाटक म्हणून आमदार बबनराव लोणीकर, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., तहसीलदार डॉ.प्रतिभा गोरे यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

तहसील कार्यालय परतूरला भेट देवून अधिकारी-कर्मचाऱ्यांचा आढावा घेतला तसेच संपुर्ण तहसील कार्यालयाची पाहणी करून संबंधित यंत्रणेला कार्यालयीन परिसर स्वच्छ आणि सुव्यवस्थित ठेवण्याच्या सुचना दिल्या. तहसील कार्यालयात भेट देणारे नागरिक व अधिकारी-कर्मचारी यांच्यासाठी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह अणि अभ्यागत कक्षात सुधारणा करण्याचे निर्देश दिले. तसेच परतूर शहरातील विविध परिसरात प्लास्टिकचा कचरा दिसून आल्याने त्याची विल्हेवाट लावण्याबाबत लोकसहभागातून कार्यवाही करण्याचे निर्देशही संबंधित अधिकाऱ्यांना दिले. त्यानंतर परतूर शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देवून विद्यार्थ्यांचे अध्ययन कौशल्य व गुणवत्ता सुधारण्याबाबत सुचना दिल्या आणि शिक्षक व विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. तसेच परतूर शहराजवळील समाज कल्याण विभागाच्या नूतन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहास भेट देऊन तेथील स्वच्छता, सुविधा व व्यवस्थापनाची पाहणीही त्यांनी यावेळी केली.

**जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जवाहर नवोदय विद्यालयास प्रत्यक्ष भेट देवून विद्यार्थ्यांसमवेत भोजनाचा घेतला आस्वाद**

अंबा-परतूर येथील पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयास प्रत्यक्ष भेट देवून विद्यार्थ्यांसोबत प्रेरणादायी मुक्त संवाद साधला. तसेच तेथे मिळणाऱ्या भोजनाबाबत चौकशी करुन स्वत: विद्यार्थ्यांसमवेत भोजन करुन भोजनगृहात देण्यात येणाऱ्या सुविधांची पाहणी केली. तसेच नवोदय विद्यालयातील रुचकर आणि स्वादीष्ट जेवण असल्याने शालेय अध्यापन व शालेय प्रशासनाच्या सुयोग्य नियोजनाबद्दल समाधान व्यक्त केले.

जवाहर नवोदय विद्यालयातील वर्ग खोल्याची पाहणी करुन सर्व वर्ग स्मार्ट क्लास रुम असल्यामुळे त्यांनी प्रशंसाही केली.

यावेळी तहसीलदार डॉ. प्रतिभा गोरे, प्राचार्य एस.जी. पवार, शिक्षक आर.जी मस्के, अमिताभ भुक्तर, आर.ए.तांदळे, नवीन जैन, पी.पी.धुसे, राकेशकुमार गुप्ता, ए.के. जोशी, नर्मदा कुमारी, रोशना रशीद, दीपिका बराईक, प्रदीपकुमार शर्मा, समीर मंत्री, व्ही.ए.आंधळे, योगेश पाटील, अधिक्षक जी.आर. सुर्यवंशी, योगेश पाटील यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

## जामखेडमध्ये प्रशासनाविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार पक्षाचे ठिय्या आंदोलन

आठ दिवसात प्रश्न मार्गी लावण्याच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे



जामखेड । प्रतिनिधी - जामखेड शहरातील नागरिक अनेक मूलभूत प्रश्नांनी हैरान झाले असून, त्याकडे नगरपरिषद प्रशासनाकडून अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार ) आणि मित्र पक्षांच्या वतीने नगरपरिषदेसमोर ठिय्या आंदोलन करण्यात आलं.

शहरात वारंवार होणारी पाणीकपात, अपुरा आणि अनियमित पाणीपुरवठा, मोकाट जनावरांचा सुळसुळाट, शहरात सर्वत्र कचरा आणि घाणीचे साम्राज्य, गल्लीगल्लीत पसरलेली अस्वच्छता आणि ठिकठिकाणी पडलेल्या रस्त्यांच्या खड्ड्यांनी नागरिकांचे जगणे अवघड झाले आहे. या सर्व तक्रारींविषयी वेळोवेळी नगरपरिषदेकडे निवेदने देण्यात आले, अर्ज आणि विनंत्या करण्यात आल्या, परंतु प्रशासनाकडून कोणत्याही ठोस उपाययोजना झाल्या नाहीत. विशेषतः नगरपरिषदेचे मुख्याधिकारी नागरिकांना भेट देण्यासही सतत टाळाटाळ करत असून यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात रोष निर्माण झाला आहे. प्रशासनाची ही वागणूक जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांचा बगल देणारी असल्याची भावना लोकांमध्ये निर्माण झाली आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने गेल्या काही दिवसांपूर्वी नगरपरिषद प्रशासन, तहसीलदार आणि पोलीस प्रशासन यांना निवेदन देऊन आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यानुसार आज हे आंदोलन करण्यात आले.

यावेळी आंदोलकांकडून जोरदार घोषणाबाजी करत प्रशासनाच्या निष्क्रियतेचा तीव्र निषेध करण्यात आला. या आंदोलनानंतरही नगरपरिषदेला जाग आली नाही तर यापेक्षाही तीव्र स्वरूपाचं आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा यावेळी आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. या आंदोलनाला राजेंद्र कोठारी (राष्ट्रवादी प्रदेश सरचटणीस ), वैजिनाथ पोले(जेष्ठ पदाधिकारी), विजयसिंह गोलेकर (तालुकाध्यक्ष), सय्यद वसिम इसाक (युवक शहर अध्यक्ष), प्रशांत जालिंदर राळेभात (तालुका युवक अध्यक्ष), रामहारी शिवाजी गोपाळघरे (तालुका युवक कार्याध्यक्ष ), मंगेश आजबे (पदाधिकारी), निखिल मुकुंद घायतडक (नगराध्यक्ष), अमोल रमेश गिरमे (मा. शहर युवक अध्यक्ष), राजेंद्र आजीनाथ गोरे (मा. शहर अध्यक्ष), मगर बाबासाहेब रामदास, फिरोज बागवान, कुंडल राळेभात, विकी घायतडक, प्रकाश सदाफुले, विक्रांत अब्दुले (काँग्रेस युवक शहराध्यक्ष) चाँद तांबोळी, उमर कुरेशी, हरिभाऊ आजबे, गणेश अशोक घायतडक, सिद्धेश्वर लटके, पोकळे अक्षय प्रमोद, दादासाहेब महाडिक, शेख बिलाल, समीर चंदन, रामहारी बाबर, बिभिशन शामराव धनवडे (मा.नगरसेवक), महेश रामचंद्र राळेभात, संजय डोके, सचिन शिंदे, रावसाहेब श्रीरामे, मनोज कार्ले, आसिफ शेख, प्रवीण उगले, अँड ऋषिकेश डूचे, पांडुरंग माने, संदीप गायकवाड, सुरेश पवार, सोहेल बागवान, निलेश रंधवे, तुषार खैरे, सागर हरीचंद्र जगताप, प्रतीक ज्ञानदेव राळेभात, शेख नय्युम सुबेदार, आण्णासाहेब ढवळे, शंकर कैलास खैरे, आण्णा चंद्रकांत मोरे, बापू लोखंडे, नाना लोखंडे, राजेश चेमटे, अशोक घुमरे, मनोज राळेभात, शेख सादिक उपस्थित होते.

ठिय्या आंदोलनामुळे झोपलेल्या प्रशासनाला खडबडून जाग आली असून नगरपरिषदेच्या विभागप्रमुखांनी आंदोलकांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. तसेच पुढील आठ दिवसात टप्प्याटप्प्याने हे विषय मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार तूर्तास हे ठिय्या आंदोलन स्थगित करण्यात आले असून दिलेल्या आश्वासनाप्रमाणे प्रशासनाने शहराचा पाणीपुरवठा, स्वच्छता, मोकाट जनावरांचा सुळसुळाट आणि रस्त्यांची कामे हे प्रश्न मार्गी लावले नाहीत तर अधिक तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## माहोरा महसुल सप्ताह निमित्याने विविध प्रमाणपत्रे वाटप



**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील माहोरा तलाठी व मंडळ कार्यालयामध्ये आज दिनांक चार ऑगस्ट रोजी महसूल सप्ताहाच्या निमित्ताने शेतकरी विद्यार्थी व विविध प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहे. या निमित्ताने जाफराबाद तहसील कार्यालयाच्या नायब तहसीलदार पुरवठा विभाग, श्रीमती मीनाताई चव्हाण,माहोरा येथील सरपंच गजानन पाटील लहाने, यांच्या हस्ते विविध प्रमाणपत्र वाटप करण्यात आले या वेळी पुरवठा विभागाचे निरीक्षक भरत आढव, माहोरा सजाचे तलाठी पाडुरंग काळवाघे, तलाठी विशाल दळवी, . तलाठी अक्षय खळवंदे, तलाठी एच.जे. इंगळे,आदी नी महसुल सप्ताहच्या निमिताने सरपंच गजानन पा.लहाने यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला.

त्या नंतर सरपंच गजानन पा.लहाने,नायब तहसिलदार श्रीमती मिनाताई चव्हाण, यांचा सत्कार करून कार्यक्रमची सुरुवात करण्यांत आली.

या वेळी ग्रा.प.सदस्य हर्षल पा.जाधव, अभिजीत थारेवाल, लक्ष्मण वाघ, किसन पा.गाढे, लक्ष्मण इंगळे, दुर्गश वाघ, बाजीराव पा.गाढे, ज्ञानेश्वर वाघ, जुलालसिंग सोळंके, सोमाथ चौधरी, तर कार्यक्रमांचे सुत्रसंचालन बाळासाहेब गव्हले, तर अभार संतोष गौरकर यांनी मानले,

## अवैध गावठी पिस्टल बाळगणारा स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात अवैद्य गावठी पिस्टल बाळगणारे इसमांची माहिती घेऊन कारवाई करणे बाबत मा.पोलीस अधीक्षक श्री.अजय कुमार बंसल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.पंकज जाधव व पथकास सूचना दिल्या होत्या.

त्यावरून मा.अप्पर पोलीस अधीक्षक श्री आयुष नोपाणी यांचे मार्गदर्शनाखाली श्री.पंकज जाधव पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे अंमलदार यांना कारवाई करण्याबाबत मार्गदर्शन केले होते.त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा चे अंमलदार हे दिनांक ०५/०८/२०२५ रोजी जालना शहरातील पोलीस ठाणे तालुका जालना हद्दीत भक्तेश्वरनगर जालना येथे पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहितीच्या आधारे इसम नामे करण किसन लांडगे राहणार भक्तेश्वरनगर जालना यास ताब्यात घेऊन त्याची अंग झडती घेतली असता त्याच्याजवळ एक गावठी पिस्टल दोन मॅग्झीन व एक खाली केलेली पिवळ्या धातूची पुंगळी जप्त केले आहे. नमूद आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे तालुका जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस अधीक्षक श्री.अजय कुमार बंसल मा.अप्पर पोलीस अधीक्षक श्री आयुष नोपाणी,अनंत कुळकर्णी उपविभागीय पोलीस अधिकारी जालना यांचे मार्गदर्शनाखाली श्री पंकज जाधव, पोलीस निरीक्षक स्थानी गुन्हे शाखा जालना, श्री.उबाळे सहाय्यक पोलीस निरीक्षक, श्री.खामगळ सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार रमेश राठोड,प्रभाकर वाघ, विजय डिक्कर, इरशाद पटेल, रमेश काळे, धीरज भोसले, योगेश सहाने सर्व स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी केली आहे.

## वरुड खुर्द येथे महसूल सप्ताहानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



**जाफराबाद-** राज्य शासनाच्या महसूल सप्ताह निमित्त वरुड खुर्द येथील स्मशानभूमीत तहसीलदार सौ. सारिका भगत यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनासह ग्रामविकासाच्या दिशेने सकारात्मक पाऊल टाकत ग्रामस्थांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या कार्यक्रमावेळी नायब तहसीलदार एस.टी. गारोळे, तलाठी इंगळे, ग्रामपंचायत अध्यक्ष दत्ता पाटील गाढे, सरपंच भाऊसाहेब गाढे, उपसरपंच रमेश गाढे तसेच ग्रामस्थ विनायक गाढे, बाजीराव गाढे, भगवान गाढे, सुरेश गाढे, गंगाधर रोडगे, अण्णा रोडगे, ज्ञानेश्वर गोरे, सुनील गाढे, रमेश गांढे, समाधान गाढे आदींची उपस्थिती होती. महसूल सप्ताहाच्या निमित्ताने वृक्षारोपण हा उपक्रम राबवून ग्रामपंचायतीने पर्यावरण संरक्षणासाठी भरीव पाऊल उचलले आहे. स्मशानभूमीसारख्या महत्त्वाच्या सार्वजनिक जागेवर हिरवळ निर्माण होणे, ही ग्रामस्थांसाठीही आश्वासक बाब ठरली.

## मंठा नगरपंचायतीत स्थायी समित्यांच्या सभापतींची निवड

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा नगरपंचायतीच्या स्थायी समिती व विषय समित्यांच्या सभापती निवडीसाठी दिनांक ६ ऑगस्ट २०२५ रोजी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले. या विशेष सभेला माजी मंत्री व मंठा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनरावजी लोणीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सभेच्या अध्यक्षस्थानी उपजिल्हाधिकारी श्री. पद्माकर गायकवाड तर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी श्री. मनोज उकिरडे हे होते. यावेळी नगराध्यक्ष सौ. वंदना वैजनाथ बोराडे, उपनगराध्यक्ष सौ. छाया अरुण वाघमारे व इतर नगरसेवक-कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. नवीन सभापतींची निवड पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आली: सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता समिती सभापती सौ. छाया अरुण वाघमारे, सार्वजनिक बांधकाम समिती सभापती नगरसेवक दीपक आसारामजी बोराडे, पुरवठा व जलनिस्सारण समिती सभापती नगरसेवक अशोक रावसाहेब खंदारे, महिला व बालकल्याण समिती सभापती सौ. यमुना शेषनारायण दवणे

या निवडीनंतर आमदार बबनराव लोणीकर यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, मंठा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. आपण नेहमी विकासाच्या कामात अग्रेसर राहू.



### राखीच्या खरेदीसाठी बहिणींची मोठी गर्दी...

रक्षाबंधनाचा सण काही दिवसांवर येऊन ठेपलेला असताना, जालना शहरातील राखी मार्केटमध्ये खरेदीसाठी बहिणींची गर्दी दिसून येत आहे. विविध रंगीबेरंगी, आकर्षक डिझाईनच्या राख्यांनी बाजारपेठा सजल्या असून, बहिणी आपल्या भावासाठी राखी खरेदी करताना उत्साहात दिसत आहेत. महाकाल, श्रीराम, छोटा भीम, स्पायडरमॅन अशा विविध थीमवरील राख्यांना यंदा विशेष मागणी असून, सणाला लागणाऱ्या अन्य वस्तूंचीही जोरदार खरेदी सुरू आहे. (छायाचित्र - किरण खानापुरे)

## पसायदान ही वैश्विक प्रार्थना आहे सर्व शाळांमध्ये ती म्हटली पाहिजे- डॉ प्रमोद कुमावत



**जालना । प्रतिनिधी -** सन २०२५ हे वर्ष संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज यांचे सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी (७५०) जयंतीवर्ष आहे. दिनांक १५ ऑगस्ट, २०२५ रोजी गोकुळ अष्टमीस संतश्रेष्ठ श्री. ज्ञानदेवांची ७५० वी जयंती असल्याने, दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजी महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेत पसायदान म्हणण्यात यावे, असे महाराष्ट्र शासनाचे पत्र आहे त्यामुळे सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या शाळांमध्ये पसायदान म्हटले पाहिजे. पसायदान ही विश्व कल्याणाची प्रार्थना आहे. या प्रार्थनेतील आशया प्रमाणे समाज निर्माण झाला पाहिजे असे प्रतिपादन विद्युत नगर, जालना येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात काल्याचे कीर्तन प्रसंगी डॉ प्रमोद महाराज कुमावत यांनी केले.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांनी विश्व कल्याणासाठी केलेली प्रार्थना म्हणजे पसायदान होय. पसायदानामध्ये केलेल्या सर्व मागण्या या जगाच्या कल्याणासाठी असल्याने या प्रार्थनेची आजही उपयुक्तता आहे व आवश्यकताही आहे. सर्व शाळांमध्ये पसायदान या विषयावर व्याख्याने आयोजित करून या प्रार्थनेचा अर्थ विद्यार्थ्यांना सांगितला तर निश्चितच विद्यार्थ्यांचे चरित्र निर्माण व व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयोग होईल. आजच्या भौतिक चंगळवादामध्ये आपण दुसऱ्यांचाही विचार करून त्यांच्याही कल्याणासाठी काही मागणे मागितले पाहिजे, प्रयत्न केले पाहिजे हा संदेश पसायदानातून मिळतो.

'गोकुळीच्या सुखा अंतपार नाही लेखा' या जगतगुरु तुकाराम महाराजांच्या अभंगावर त्यांनी निरूपण केले. वारकरी संप्रदायातील काला हा समतेचे प्रतीक आहे. सर्वांना सोबत घेऊन भगवान श्रीकृष्णाने क्रांती केली असेही ते म्हणाले.

या सप्ताहात हभप सागर महाराज चापाईतकर यांनी पारायणाचे नेतृत्व केले. हभप बाबाराव महाराज कायंदे यांचे प्रवचन सेवा संपन्न झाली. कीर्तनाला गायणाचार्य अशोक महाराज पाथ्रुडकर, हभप विष्णू महाराज जिरेकर, आदी उपस्थित होते. मंडळाचे अध्यक्ष थोरात साहेब, विठ्ठलराव काचेवाड यांच्यासह सप्ताह यशस्वी करण्यासाठी विद्युत नगर येथील सर्व निवृत्त मंडळी, महिला मंडळ यांनी परिश्रम घेतले.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.